**॥ श्री ॥**

**॥ बाबा ॥**

**काकडा**

गुरूराया अर्जिचा हा काकडा करीतो, बाबा काकडा करीतो
दयेच्या या सहाणेवरती कापुस हा ठेविते,
बाबा कापुस ठेविते ।

माया मोहाचा हा पिच्छा करूनी वेढा हा वळीते,
बाबा वेढा वळीते ॥

क्षमा चे दीप घेऊन काकडा ठेवीते बाबा काकडा ठेवीते
ह्रदयाच्या या पाटावर बाबांना बसविते,
बाबांना बसविते ॥

भक्तीची ही रांगोळी काढूनी शांतीचे हे गंध लावीते
बाबा गंध लावीते ॥

मी माझे ही द्वैत बुद्धी काकडा लाविते बाबा काकडा लाविते
सद्भावाने सद्भक्तिने शरणागत येते
बाबा शरणागत येते ॥

चित्ताची ही झोळी पसरून शरणागत येते
बाबा शरणागत येते ॥

नाममय घेऊन जावे आशिर्वाद मागते बाबा
आशिर्वाद मागते ॥

अनंत अपराधांची रास तव कृपा असावी
तव कृपा असावी ॥

★★★★★